10) Dr. S.P. Ghogale
11) Dr. S.S. Pawar
12) Dr. M. Kurmi

ECONOMICS

1) Dr. S.T. Kute (Chairman)
2) Sh. K.V. Sable
3) Dr. P.J. Katole
4) Dr. Mrs. V.J. Sawarkar
5) Dr. R.R. Gawhale
6) Dr. K.R. Rajput
7) Dr. S.S. Naik
8) Dr. R.B. Bhandwalkar
9) Dr. R.K. Shaikh
10) Dr. T.V. Munde
11) Dr. H.R. Tiwari
12) Sh A.R. Soni

POLITICAL SCIENCE

1) Dr. Sau. A.J. Tidke (Chairman)
2) Dr. R.V. Rathod
3) Dr.. S.S. Gawai
4) Dr.S.K. Yerankar
5) Dr. P.H. Suryawanshi
6) Dr. D.R. Yawale
7) Dr. D.P. Telgote
8) Dr. S. Deolankar
9) Dr. K.H. Wasnik
10) Dr. V.R. Bobde
11) Dr. S.P. Chavan
12) Sh. D.V. Gomase

SOCIOLOGY

1) Dr. B.H. Kirdak (Chairman)
2) Dr. K.B. Nayak
3) Dr. D.E. Umbarkar
4) Dr. D.S. Bhagat
5) Dr. Mrs. V. D. Gudadhe
6) Dr. A.D. Chavhan
7) Dr.S.S.Somvanshi
8) Dr. R.M. Sarpate
9) Dr. Mrs. S.S. Awachar
10) Dr. D.R. Khairnar
11) Dr. V.U. Garkal

PHILOSOPHY

1) Dr. S.A. Kalmegh (Chairman)
2) Dr. B.M. alias Santoshrao Thakare
3) Dr. V.S. Patil
4) Dr. S.V. Salunke
5) Sh.A.V. Deshmukh (upto 31.10.2014)

PSYCHOLOGY

1) Dr. S.K. Sharma (Chairman)
2) Dr. S.D. Wakode
3) Dr. Mrs. N.H. Deshmukh
4) Dr. D.S. Ramteke
5) Dr. H.B. Yawalikar

GEOGRAPHY

1) Dr. S.B. Akhare (Chairman)
2) Sh. T.J. Dhote
3) Dr. Smt. R.M. Deshmukh
4) Dr. M.B. Gathe
5) Dr. Ku. J.S. Ingole
6) Dr. O.B. Munde
7) Dr. Smt. A.P. Patil
8) Dr. D.S. Sinkar
9) Dr. A.S. Kalikar
10) Dr. B.N. Gophane
11) Dr. D.A. Gedam
12) Dr. J.J. Gangrediwar

HOME ECONOMICS

1) Dr.Mrs. S.S. Gawande (Chairperson)
2) Dr. Mrs. J.V. Haware
3) Dr. Ku. S.A. Jawanjal
4) Dr. Mrs. A.S. Tidke
5) Dr. Mrs. A.R. Deshmukh
6) Dr. Mrs. S.B. Sabane
7) Dr. Sau. M.V. Lokhande
8) Dr. Mrs. M.P. Barapatre
9) Dr. Ku. K.W. Kitey
10) Dr. Mrs. L.S. Kandalkar
11) Mrs. P.S. Nagmote

LIBRARY & INF. SCIENCE

1) Dr. N.N. Gawande (Chairman)
2) Dr. Mrs. V.P. Gudadhe
3) Dr. S.M. Rokade
4) Dr. Mrs. D. Rajyalakshmi

(9) FACULTY OF HOME SCIENCE HOME SCIENCE

1) Dr. Smt. M. P. Kale (Chairperson)
2) Dr.Smt. A.G. Mane (upto 30/9/2015)
3) Dr. Smt.R. A. Lande
4) Dr. A.S. Rathod
5) Dr. Smt.V.B. Wankhade
6) Dr. Mrs. A.S. Deshmukh
7) Dr. Smt.J.P. Mankar
8) Dr.Smt. J.A. Patil (upto 3/8/2015)
9) Dr. A.N. Kakade

९) परीक्षा मंडळ सदस्यांची यादी

(As per provision of Sub-Section (3) of Section 31 of Maharashtra Universities Act, 1994)

१)	डॉ.एम.के.खेडकर, मा.कुलगुरू (२३.२.२०१६ पर्यंत) डॉ.व्ही.एस. सपकाळ (२४.२.२०१६ पासून १.६.२०१६ पर्यंत) डॉ.एम.जी. चांदेकर (कुलगुरू) (२.०६.२०१६ पासून)	-	अध्यक्ष
२)	डॉ.जे.ए.तिडके, (२३.२.२०१६ पर्यंत)	-	सदस्य
३)	डॉ.मनोज तायडे (१२.८.२०१५ पासून)	-	सदस्य
४)	डॉ.एफ.सी.रघुवंशी	-	सदस्य
५)	डॉ.व्ही.एस.चौबे	-	सदस्य
६)	डॉ.ए.व्ही.चांदेवार	-	सदस्य
७)	डॉ.पी.डब्ल्यू काळे	-	सदस्य
८)	डॉ.मार्कस्.एच.लाकडे	-	सदस्य
९)	डॉ.जी.आर.बमनोटे	-	सदस्य
१०)	डॉ.बी.एम. उपाख्य संतोषराव ठाकरे	-	सदस्य
११)	डॉ.श्रीमती आर.ए. लांडे	-	सदस्य
१२)	डॉ.डी.टी.महाजन (३१.८.२०१५ पर्यंत)	-	सदस्य
१३)	डॉ.एस.जी.भडांगे (३१.८.२०१५ पर्यंत)	-	सदस्य
१४)	सहसंचालक, (उच्च शिक्षण)	-	सदस्य
१५)	डॉ.व्ही.आर.देशमुख (३१.८.२०१५ पर्यंत)	-	सदस्य
१६)	डॉ.जे.डी.वडते, परीक्षा नियंत्रक	-	सदस्य सचिव

१०) प्रौढ, निरंतर शिक्षण आणि विस्तार सेवा मंडळाचे सभासद

(As per provision of Sub Section (1) of Section 39 of Maharashtra Universities Act,1994)

१)	डॉ.एम.के.खेडकर	-	अध्यक्ष
२)	डॉ.डी.एच. काळे		
३)	डॉ. के.ए. फाले		
४)	डॉ.डी.जी. वाकडे		
५)	श्री किशोर रिठे		
६)	स्टेशन डायरेक्टर, अकोला		
७)	मा. संचालक, प्रौढ शिक्षण नवी दिल्ली		
८)	मा. संचालक, प्रौढ शिक्षण, पुणे		
९)	डॉ. गणेश मालटे		कायम निमंत्रीत
१०)	डॉ. श्रीकांत पाटील		सदस्य सचिव

11) Students Council
(As per provision of Section 40 of M.U. Act, 1994)

निरंक

संत्र २०१५-१६ मध्ये विद्यार्थी परिषदेचे गठन झाले नाही.

१२) विद्याशाखांचे अधिष्ठाते
महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ अंतर्गत विद्याशाखांचे अधिष्ठाते

अ.क्र.	विद्याशाखा	अधिष्ठात्यांचे नाव
१)	वाङ्मय	डॉ मनोज एच. तायडे (दि. १०.८.२०१५ पासून)
२)	विज्ञान	डॉ.एफ.सी. रघुवंशी
३)	विधी	डॉ.व्ही.एस. चौबे
४)	आयुर्विज्ञान	डॉ.ए.व्ही. चांदेवार
५)	वाणिज्य	डॉ. पी. डब्ल्यू. काळे
६)	शिक्षण	डॉ. मार्कस एच. लाकडे
७)	अभियांत्रिकी व तांत्रिकी	डॉ.जी.आर. बमनोटे
८)	समाजविज्ञान	डॉ.बी.एम उपाख्य संतोषराव ठाकरे
९)	गृहविज्ञान	डॉ.श्रीमती आर.ए. लांडे
१०)	आयुर्वेद	रिक्त

१३) तक्रार निवारण समिती सदस्यांची यादी.

(म.वि. कायदा १९९४ कलम ५७ (३) नुसार)

१)	डॉ.जे.ए. तिडके, मा. प्र.- कुलगुरू	-	अध्यक्ष
२)	प्राचार्य, डॉ.एस.जी. भडांगे		
३)	प्राचार्य, डॉ.डी.व्ही. अतकरे		
४)	डॉ.एस.एस. गवई		
५)	सौ.माधुरी एस. चेंडके		
६)	प्राचार्य, डॉ.ए.एस. राठोड		
७)	डॉ.अ.धों. चव्हाण	-	सदस्य सचिव

१४) संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाचे प्रशासकीय अधिकारी

अ.क्र.	पदाचे नांव	अधिकाऱ्याचे नांव	कालावधी
१.	मा. कुलगुरू	डॉ. एम.के. खेडकर	दि. २३.०२.२०१६ पर्यंत
		डॉ.व्ही.एस. सपकाळ	दि. २४.०२.२०१६ ते ०१.०६.२०१६
		डॉ.मु.गो.चांदेकर	दि.०२.०६.२०१६ पासून
२.	प्र-कुलगुरू	डॉ. जे.ए. तिडके	दि.२३.०२.२०१६ पर्यंत
३.	कुलसचिव	डॉ.अ.धों. चव्हाण	दि.३१.०८.२०१५ पर्यंत
		डॉ.अजय देशमुख	दि. ०१.०९.२०१५ पासून
४.	परीक्षा नियंत्रक	डॉ.ज.द. वडते	
५.	संचालक, महाविद्यालय व विद्यापीठ विकास मंडळ	डॉ.आर.एस. सपकाळ	दि. २३.०२.२०१६ पर्यंत
		डॉ.आर.एस. सपकाळ	दि.०२.०३.२०१६ ते ०२.०६.२०१६
६.	ग्रंथपाल	डॉ.एम.आर.खेरडे	
७.	वित्त व लेखा अधिकारी (अतिरिक्त कार्यभार)	श्री. दि.स. राऊत	दि.०३.०९.२०१५ पर्यंत
		डॉ.श.रा. आस्वले	दि.०४.०९.२०१५ पासून
८.	संचालक, प्रौढ व निरंतर शिक्षण व विस्तार सेवा	डॉ.एस.एस.पाटील	
९.	संचालक, विद्यार्थी कल्याण	डॉ.ग.गो. मालटे	
१०.	प्र.संचालक, ॲकेडेमिक स्टाफ कॉलेज	डॉ.एस.आर. माणिक	
११.	उपकुलसचिव (विद्या)	श्री दि.स.राऊत	
१२.	उपकुलसचिव (प्रशा.)	श्री प्र.वा. राठोड	
१३.	उपकुलसचिव (मावक)	श्रीमती स.मा. मोहोड	
१४.	उपकुलसचिव (विकास)	श्री मं.के.वरखेडे	
१५.	उपकुलसचिव (म.वि.)	डॉ.अ.धों.चव्हाण	
१६.	उपकुलसचिव (विधी)	श्री मं.म.जायले	
१७.	उपकुलसचिव (गोपनीय)	श्री.वि.रा.मालवीय	दि.०६.१०.२०१५ पर्यंत
१८.	उपकुलसचिव (लेखा)	श्री वि.रा. मालवीय	दि.०७.१०.२०१५ पासून
१९.	उपकुलसचिव (शै.वि.प्र.केंद्र)	श्रीमती नि.कि.रंगारी	दि.१८.०९.२०१५ पासून
२०.	उपकुलसचिव (प/चौ.)	श्रीमती नि.कि.रंगारी	दि.१९.०९.२०१५ पासून
२१.	सहा.कुलसचिव (भांडार)	श्री.प्र.वि. फुलाडी	

अ.क्र.	पदाचे नांव	अधिकाऱ्याचे नांव	कालावधी
२२.	सहा. कुलसचिव (अंके.)	श्री. शि.नि. कुळकर्णी	
२३.	सहा.कुलसचिव (लेखा)	श्री. ऋ.व.दशमुखे	दि.०६.१०.२०१५ पर्यंत
२४.	सहा.कुलसचिव (गोपनीय)	श्री. ऋ.व. दशमुखे	दि.०७.१०.२०१५ ते ०१.०५.२०१६
२५.	सहा.कुलसचिव (गोपनीय)	श्री.वा.प.वानखडे	दि.०२.०५.२०१६ पासून (अतिरिक्त कार्यभार)
२६.	सहा.कुलसचिव (प्रशा.)	श्री. म.म. फरदळे	
२७.	सहा.कुलसचिव (सारणी)	श्री. दि.वि. वानखडे	
२८.	सहा.कुलसचिव (सारणी)	श्री. ऋ.व.दशमुखे	दि.०२.०५.२०१६ पासून
२९.	सहा.कुलसचिव (परीक्षा)	श्री.अ.दा. वानखेडे	
३०.	सहा.कुलसचिव (परीक्षा)	श्री.सं.अ. एरंडे	दि.१८.०१.२०१६ पर्यंत
३१.	सहा.कुलसचिव (नामांकन)	श्री.सं.अ. एरंडे	दि.१९.०१.२०१६ पासून
३२.	सहा.कुलसचिव (आचार्य कक्ष)	श्री.सु.रा.बंड	
३३.	सहा.कुलसचिव (म.वि.)	श्री.आर.यु.येवतीकर	
३४.	सहा.कुलसचिव (नामांकन)	कु.मो.सू.वानखेडे	दि.१४.०१.२०१६ पर्यंत (दि.१५.०१.२०१६ ते १२.०७.२०१६ पर्यंत १८० दिवस प्रसुती रजा)
३५.	कार्यकारी अभियंता	श्री.श.गु.रोडे	
३६.	प्रमुख, संगणक केंद्र	श्री. दिनेशकुमार जोशी	
३७.	यंत्रणा विश्लेषक (संगणक केंद्र)	श्री.एन.एस. खान	
३८.	यंत्रणा विश्लेषक (संगणक केंद्र)	डॉ.नि.अं. कोळी	
३९.	कार्यक्रमकर्ता (संगणक केंद्र)	श्री.सु.ना. नाफडे	
४०.	सहा.ग्रंथपाल (विद्यापीठ ग्रंथालय)	श्री.डी.के. डोंगरे	
		श्री. वि.द. बापते	
४१.	संचालक (शा.शि.)	डॉ.अ.मु. असनारे	
४२.	माहिती शास्त्रज्ञ	श्री. रा.भ.जावळे	
४३.	विद्यापीठ उपअभियंता (विद्युत)	श्री.आर.एस. एडले	
४४.	जनसंपर्क अधिकारी	डॉ.वि.रा. नांदुरकर	
४५.	सुरक्षा अधिकारी	श्री.अ.ल.घोम	दि.२९.०५.२०१५ पर्यंत (अतिरिक्त कार्यभार)
		श्री.म.म. फरदळे	दि. ३०.०९.२०१५ पासून (अतिरिक्त कार्यभार)

१५) संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाचा नियमित कर्मचारी वर्ग

१)शिक्षक पदे	शासनमान्य पदे	विद्यापीठ अनुदान आयोगाद्वारे मान्य पदे	एकूण
प्राध्यापक	१७	–	१७
सह. प्राध्यापक	२९	२ (ॲके.स्टाफ कॉलेज)	३१
सहा. प्राध्यापक	६५	११ (ॲके.स्टाफ कॉलेज)	७६
ग्रंथपाल	१	-	१
संचालक, प्रौढ व निरंतर शिक्षण आणि विस्तार सेवा	१	-	१
सहा. ग्रंथपाल	२	-	२
संचालक, शारीरिक शिक्षण	१	-	१
संचालक (ॲके. स्टाफ कॉलेज)	-	१	१
प्रमुख, संगणक केंद्र	१	-	१
यंत्रणा विश्लेषक	२	-	२
माहिती शास्त्रज्ञ	१	-	१
	१२० + ७ @	*** १४**	**१३३ + ७ @**

***** विद्यापीठ अनुदान आयोगाच्या १२ व्या योजनेअंतर्गत दि. ३१.३.२०१७ पर्यंतच्या कालावधीकरिता मंजूर पदे.

@ ही पदे 'डॉ. श्रीकांत जिचकार मेमोरिअल रिसर्च सेंटर फॉर हिस्ट्री ॲन्ड कल्चर' साठी एकत्रित वेतनावर मंजूर आहे.

शिक्षक संवर्गात : संचालक - १ प्राध्यापक - २ व प्रपाठक - ४ (एकूण ७)

शिक्षकेतर संवर्गात : साहाय्यक -१, व शिपाई - १ (एकूण २)

२) शिक्षकेतर पदे	शासनमान्य पदे	विद्यापीठ अनुदान आयोगाद्वारे मान्य पदे	एकूण
प्रथम श्रेणी	४०	–	४०
द्वितीय श्रेणी	२९	*** २ + १ # = ३**	३२
तृतीय श्रेणी	२६० + १४ (भूतसंवर्गात मंजूर)	*** ४ + २ # = ६**	२८०
चतुर्थ श्रेणी	१५२	*** २ + १ # = ३**	१५५
	४९५ + २ @	*** ८ + ४ #**	**५०७ + २ @**

***** विद्यापीठ अनुदान आयोगाच्या १२ व्या योजनेअंतर्गत राज्यशासन जबाबदारी स्वीकारीपर्यंत मंजूर पदे.

@ ही पदे 'डॉ. श्रीकांत जिचकार मेमोरिअल रिसर्च सेंटर फॉर हिस्ट्री ॲन्ड कल्चर' साठी एकत्रित वेतनावर मंजूर आहे.

शिक्षकेतर संवर्गात : रिसर्च असिस्टंट - १ व शिपाई - १ (एकूण ४)

ही पदे 'वुमेन्स स्टडीज सेंटर' साठी एकत्रित वेतनावर खालील प्रमाणे मंजूर आहे.

शिक्षकेतर संवर्गात रिसर्च असिस्टंट -१ व शिपाई - १ (एकूण ४)
प्रोफेशनल असिस्टंट - १
डाटा एन्ट्री ऑपरेटर - १

प्रकरण दुसरे

३२ वा दीक्षांत समारंभ

दिनांक २० फेब्रुवारी, २०१६

विद्यापीठाचा बत्तिसावा दीक्षांत समारंभ दि. २० फेब्रुवारी २०१६ रोजी मा. कुलगुरू डॉ. मोहन खेडकर यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाला. या दीक्षांत समारंभाला **मुख्य अतिथी म्हणून केमिकल टेक्नॉलॉजी संस्था, मुंबईचे कुलगुरु प्रो.जी.डी. यादव यांनी उपस्थित राहून दीक्षांत भाषण दिले.** या दीक्षांत समारंभांला प्र. कुलगुरू डॉ. जयकिरण तिडके संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, माजी कुलगुरू डॉ.जी.व्ही. पाटील, माजी प्र-कुलगुरु डॉ.व्ही.एस. जामोदे व्यवस्थापन परिषदेचे सदस्य, अधिष्ठाते, प्राधिकारिणींचे सदस्य, त्याच प्रमाणे दानदाते, शासकीय अधिकारी, आचार्य पदवीधारक, गुणवत्ताप्राप्त विद्यार्थी, प्रतिष्ठित नागरिक, पत्रकार, शिक्षक, अधिकारी, कर्मचारी व विद्यार्थी बहुसंख्येने उपस्थित होते.

१. दीक्षांत समारंभातील पदवीकांक्षींची संख्या :

(एकूण पदवीकांक्षीची संख्या स्तंभ ३ व प्रत्यक्ष पदवी ग्रहण करणाऱ्यांची संख्या स्तंभ ४ मध्ये दिली आहे.)

अ.क्र.	पदवीचे नांव	पदवीकांक्षीची संख्या	प्रत्यक्ष पदवी ग्रहण करणाऱ्यांची संख्या
१	२	३	४
१.	वाङ्मय पारंगत	३४५८	८५२
२.	वाङ्मय स्नातक	७०८३	२६१९
३.	प्रादर्शिक कला स्नातक	१३	०४
४.	समाजकार्य पारंगत	३०५	५८
५.	समाजकार्य स्नातक	२८९	९८
६.	ग्रंथालय शास्त्र पारंगत	२०	०७
७.	ग्रंथालय शास्त्र स्नातक	९४	२६
८.	पत्रकारिता पारंगत	३५	१५
९.	पत्रकारिता स्नातक	२०	०९
१०.	वाङ्मय स्नातक समाजकार्य	२०	१३
११.	बी.एफ.ए.	१३	०६
१२.	तत्त्वज्ञान पारंगत (कला)	०९	०७
१३.	तत्त्वज्ञान पारंगत (समाजशास्त्र)	०७	०३
१४.	वाङ्मय आचार्य	४५	४५
१५.	समाजकार्य आचार्य	७७	७७
१६.	वाणिज्य पारंगत	३७०	१६२
१७.	वाणिज्य स्नातक	४४१३	२१९६
१८.	व्यवसाय प्रशासन पारंगत	३५५	१४७
१९.	व्यवसाय प्रशासन स्नातक	२३९	१२६
२०.	औद्योगिक संबंध आणि कार्मिक प्रशासन पारंगत	१९	०८
२१.	एम.सी.एम.	६५	२४
२२.	तत्त्वज्ञान पारंगत (वाणिज्य)	२२	२०
२३.	वाणिज्य आचार्य	१६	१६
२४.	विज्ञान पारंगत	८४८	५६८
२५.	विज्ञान स्नातक	१९८५	१०१२

१	२	३	४
२६.	संगणकशास्त्र स्नातक	५३१	३१५
२७.	पदव्युत्तर पदविका (वेब टेक अँन्ड मल्टीमीडिया)	०७	०२
२८.	पदव्युत्तर पदविका (मेक्याट्रोनिक्स)	०५	०२
२९.	विज्ञान आचार्य	८४	८४
३०.	गृहविज्ञान पारंगत	३६	२५
३१.	गृहविज्ञान स्नातक	१२७	७७
३२.	फॅशन डिझायनिंग स्नातक	१८	०५
३३.	सौंदर्य प्रसाधने पारंगत	२०	०८
३४.	सौंदर्य प्रसाधने स्नातक	४०	०४
३५.	गृहविज्ञान आचार्य	०१	०१
३६.	शिक्षण पारंगत	१४६	६४
३७.	शिक्षण स्नातक	३१६१	९४०
३८.	शारीरिक शिक्षण पारंगत	६९	२०
३९.	शारीरिक शिक्षण स्नातक (एक वर्षीय)	१२७९	२२४
४०.	शारीरिक शिक्षण स्नातक (तीन वर्षीय)	१३०	१९
४१.	पदव्युत्तर पदविका इन योगा थेरपी	०७	–
४२.	शिक्षण आचार्य	१५	१५
४३.	शारीरिक शिक्षण आचार्य	१५	१५
४४.	विधी पारंगत	२९	१०
४५.	विधी स्नातक (तीन वर्षीय)	११०	७०
४६.	विधी स्नातक (पांच वर्षीय)	४४	१३
४७.	बी.ए.इन. लॉ.	४७	२७
४८.	पदव्युत्तर पदविका इन मानव अधिकार	०२	०२
४९.	पदव्युत्तर पदविका इन टॅक्सेशन	०१	–
५०.	पदव्युत्तर पदविका इन मेडीकल ज्युरी	०७	०२
५१.	आचार्य विधी	०३	०३
५२.	भेषजी पारंगत	१३३	२४
५३.	भेषजी स्नातक	४१८	१५१
५४.	भेषजी आचार्य	०२	०२
५५.	अभियांत्रिकी पारंगत /एम.टेक	५७८	२८७
५६.	विज्ञान पारंगत (उपयोजित परमाणू)	०८	०५
५७.	संगणकशास्त्र पदव्युत्तर पदविका	०२	०२
५८.	अभियांत्रिकी स्नातक	५४५५	२२२६
५९.	अभियांत्रिकी स्नातक (पार्ट टाईम)	११	०४
६०.	तांत्रिकी स्नातक (सर्व)	१६०	५१
६१.	वस्त्रोद्योग स्नातक	४६	०२
६२.	वास्तुशास्त्र स्नातक	५१	२३
६३.	एम.सी.ए.	५१९	१२८
६४.	अभियांत्रिकी आचार्य	४२	४२

२) बत्तिसावा दीक्षांत समारंभ

दिनांक २० फेब्रुवारी, २०१६

मा. कुलगुरू डॉ. मोहन खेडकर यांचे

प्रास्ताविकपर भाषण

उपस्थित सर्वांना नमस्कार!

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्या बत्तिसाव्या दीक्षांत समारंभाचे प्रमुख अतिथी मुंबई येथील रसायन तंत्रज्ञान संस्थेचे (आय.सी.टी.चे) अध्यक्ष पद्मश्री मा. डॉ. जी.डी.यादव, समारंभास उपस्थित संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाचे सर्व माजी कुलगुरू, प्र-कुलगुरू, अधिसभा, व्यवस्थापन व विद्वत परिषदेचे सर्व आजी-माजी सन्माननीय सदस्य, विविध विद्याशाखांचे अधिष्ठाता, विविध पूर्व-प्राधिकरण सदस्य, उपस्थित लोकप्रतिनिधी, प्राचार्य, शिक्षक, विद्यापीठाचे अधिकारी, शिक्षकेतर कर्मचारी, शिक्षणप्रेमी नागरिक, पत्रकार बंधू आणि माझ्या विद्यार्थी मित्रमैत्रिणींनो..

विद्यापीठाच्या बत्तिसाव्या दीक्षांत समारंभात कुलगुरू म्हणून मी आपणा सर्वांचे सहर्ष स्वागत करतो.

सर्वप्रथम, आजच्या दीक्षांत समारंभास लाभलेले प्रमुख अतिथी पद्मश्री मा. डॉ. गणपती यादव यांचा थोडक्यात परिचय करून देतो. डॉ. गणपती यादव हे मुंबई येथील रसायन तंत्रज्ञान संस्था (आय.सी.टी) या अभिमत विद्यापीठाचे कुलगुरू असून विख्यात प्राध्यापक तसेच जगदीशचंद्र बोस राष्ट्रीय फेलो म्हणून त्यांचा लौकिक आहे. मेलबोर्न-ऑस्ट्रेलिया तसेच सासकेटन-कॅनडा येथील विद्यापीठात ते ॲडजंक्ट प्रोफेसर राहिले आहेत. त्यांच्या नेतृत्वाखाली रसायन तंत्रज्ञान संस्थेची भरभराट झाली आहे. या संस्थेस २०१२ मध्ये उत्कृष्ट केंद्र (सेंटर ऑफ एक्सलंस) म्हणून महाराष्ट्र शासनाची मान्यता मिळाली. लेखक म्हणून त्यांनी तीन पुस्तके लिहिली असून आतापर्यंत त्यांचे ३३० शोधनिबंध प्रकाशित झालेत. एच. इंडेक्स ४४, आय १० इंडेक्स १६४, तर पुस्तके, लेख, पेटंट्स इत्यादी मिळून ७३०० उव्दृते (सायटेशन्स) त्यांना प्राप्त झाले आहेत. त्यांच्या नावावर ७५ पेटंट्स असून आतापर्यंत त्यांनी ८३ संशोधकांना पीएच.डी.साठी मार्गदर्शन केले आहे.

डी. एम.त्रिवेदी जीवनगौरव पुरस्कार, डॉ. बी.पी.गोदरेज जीवनगौरव पुरस्कार, उत्कृष्ट संशोधक पुरस्कार असे विविध पुरस्कार त्यांना प्राप्त झालेत. इंग्लंडच्या रॉयल सोसायटी ऑफ केमेस्ट्रीची त्यांना फेलोशिप मिळाली. विज्ञान आणि अभियांत्रिकी क्षेत्रातील त्यांच्या बहुमोल कामगिरीचा परिपाक म्हणजे भारत सरकारने २०१६ चा पद्मश्री पुरस्कार बहाल करून त्यांना सन्मानित केले आहे.

शिक्षण, संशोधन याव्यतिरिक्त साहित्य, तत्त्वज्ञान, व्युत्पत्तिशास्त्र यामध्ये डॉ. गणपती यादव यांना रुची असून संस्कृत भाषेविषयी विशेष आस्था आहे. त्यांचा एक वेगळा आणि विशेष छंद म्हणजे ते मराठी आणि इंग्रजीतून कवितालेखन करतात.

असे व्यासंगी व्यक्तिमत्त्वाचे धनी अतिथी म्हणून आजच्या दीक्षांत समारंभाला लाभले आहेत. त्यांचे मी मनापासून स्वागत करतो.

मित्रहो, दि. १ मे २०८३ रोजी संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाची स्थापना झाली. गेली ३२ वर्षे विविध शैक्षणिक विभाग व संलग्नित महाविद्यालयांच्या माध्यमातून विद्यापीठ ज्ञानदानाचे पवित्र कार्य करीत आहे. आज या विद्यापीठाशी ४१३ महाविद्यालये संलग्नित असून त्यापैकी १२५ महाविद्यालये विद्यापीठ अनुदान आयोगाच्या २ (f) १२ (B) सूचीमध्ये समाविष्ट झालेली आहेत. विविध महाविद्यालये तसेच विद्यापीठातील विभागांतून नऊ विद्याशाखांतर्गत पदवी आणि पद्व्युत्तर शिक्षण दिले जाते. २०१६ च्या उन्हाळी परीक्षेमध्ये विविध विद्याशाखांमधील एकूण ५९० परीक्षांना, अंदाजे ३,१५,००० परीक्षार्थी प्रवेशित आहेत. आजच्या दीक्षांत समारंभामध्ये विविध विद्याशाखांमधील ३३८ संशोधकांना आचार्य पदवी प्रदान करण्यात आली तसेच १०१ सुवर्णपदके, २२ रौप्यपदके आणि २४ रोख पारितोषिकांचे वितरण करण्यात आले. विद्यापीठाच्या परीक्षा विभागातील सारणी तक्त्यांचे डिजिटीलायझेशन करण्यात येत आहे. तसेच Examination Reform अंतर्गत राजेश अग्रवाल समितीच्या शिफारशीवरून EMS (Exm. Management system) मध्ये ICT द्वारा परीक्षेच्या आवेदन पत्रापासून गुणपत्रिका प्रदान करण्यापर्यंत (End to End Solution) सर्व प्रक्रिया पार

पाडण्यात येतील. या योजनेची अंमलबजावणी सुरु झालेली आहे. परीक्षेसंबंधी विद्यार्थ्यांना येणाऱ्या अडचणीपासून मुक्तता देण्याचा हा आमचा प्रयत्न आहे. महाराष्ट्रातील विद्यापीठामध्ये हा प्रयोग पूर्णपणे राबवणारे बहुदा हे पहिलेच विद्यापीठ असावे.

उच्च शिक्षण देण्याचे कर्तव्य पार पाडत असतानाच त्याविषयीची गुणवत्ता उंचावत ठेवण्याचा विद्यापीठाचा कायम ध्यास असतो. आपल्या शैक्षणिक गुणवत्तेचे मूल्यमापन करून घेण्यासाठी संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाने राष्ट्रीय मूल्यांकन व अधिस्वीकृती परिषद, बंगलोरला (नॅकला) 'स्वयं अध्ययन अहवाल' (सेल्फ स्टडी रिपोर्ट) सादर केला होता. नॅकला सामोरे जाण्याची ही आपली तिसरी वेळ (थर्ड सायकल) होती. मागच्या वेळी विद्यापीठाला २.६३ असे गुणांकन व 'ब' श्रेणी प्राप्त झाली होती.यावेळी अलीकडेच झालेल्या मूल्यांकनातून आपल्या विद्यापीठाला ३.०७ असे गुणांकन व 'अ' श्रेणी प्राप्त झाली. विद्यापीठाच्या इतिहासात नॅककडून 'अ' श्रेणी प्राप्त होण्याची ही पहिलीच वेळ आहे. या यशाबद्दल कुलगुरू म्हणून मी आनंद व्यक्त करतो. ही कामगिरी साध्य करण्यासाठी विद्यापीठातील शेवटच्या कर्मचाऱ्यापासून ते वरिष्ठ अधिकाऱ्यांपर्यंत सर्वांचेच योगदान लाभले. पाच वर्षातील कामगिरीच्या मूल्यमापनाची ही फलश्रुती असल्याने व्यवस्थापन परिषद, अधिसभा, विद्यासभा, संबंधित सर्व प्राधिकरणांनी व संलग्नित महाविद्यालयांनी जे उत्तम कार्य केले त्याविषयी मी समाधान व्यक्त करतो. तसेच विद्यापीठाचा नावलौकिक उंचावण्यासाठी हातभार लागलेल्या सर्वांचे आभार मानतो.

नॅकद्वारे पाहणी करण्यासाठी आलेल्या राष्ट्रीय पातळीवरील दहा तज्ञांच्या चमूने आपल्या अहवालात विद्यापीठातील सोयी-सुविधांची तसेच वैशिष्ट्यपूर्ण उपक्रमांची नोंद केली. त्यातील काही बाबी अशाः

- वृक्षवेलींनी नटलेला उत्तम भौतिक सोयीसुविधांनी सज्ज एकात्म शैक्षणिक परिसर.
- ८३ पूर्णवेळ शिक्षकांपैकी ६३ पीएच.डी. प्राप्त शिक्षक.
- कार्यक्षम माहिती-तंत्रज्ञान प्रणालीवर आधारित परीक्षा पद्धती.
- नेट-सेट-गेट आणि अभ्यासपूरक अभ्यासक्रमामध्ये वृद्धी.
- एकूण अर्थसंकल्पाच्या ८.७३ टक्के तरतूद संशोधनासाठी
- पुस्तकलेखन आणि उत्तम एच.इंडेक्स, इंम्पॅक्ट फॅक्टरसह शोधनिबंध यात अग्रेसर.
- नोंदणी झालेल्या २४ पेटंट्सपैकी ७ पेटंट्स प्रकाशित.
- मल्टी-मिडिया साधनासह आधुनिक सुसज्ज स्मार्ट क्लासरुम्स.
- १२०० संगणक इंटरनेट-इंट्रानेट सुविधांसह उपलब्ध.
- ग्रंथालय कंसोर्शियाच्या साहाय्याने संलग्नित महाविद्यालयांशी जोडलेले ग्रंथालय.
- युवक महोत्सव, सांस्कृतिक कार्यक्रम आणि क्रीडा क्षेत्रात नेत्रदीपक कामगिरी.
- विविध अध्यासनांच्या माध्यमातून मूल्यशिक्षक आणि सामाजिक जाणीवजागृती.
- ऊर्जाबचत उपायांची अंमलबजावणी.
- जलव्यवस्थापन, जलपुनर्भरण, सौरऊर्जा, पर्यावरणपूरक उपाययोजना.
- संत गाडगे बाबांच्या विचारांनी प्रेरित क्रियाशील आणि शिस्तबद्ध विद्यार्थी-शिक्षक.
- कमवा-शिका योजनेद्वारे विद्यार्थ्यांना व्यापक प्रमाणात साहाय्य.
- रॅगिंगमुक्त सुरक्षित शैक्षणिक परिसर.
- विद्यार्थ्यांच्या व्यावसायिक कौशल्यांचा निरंतर विकास.

मित्रहो नॅकच्या संदर्भात आपण गुणवत्तेची २.६३ वरुन ३.०७ पर्यंत जी उडी घेतलेली आहे, ती काही साधी नव्हे. पण ती आपण घेऊ शकलो, हे खरे आहे. याचा अर्थ असा की, कठोर निश्चयाने आपण यश साध्य करू शकतो.**"निश्चयाचे बळ तुका म्हणे तेचि फळ"** हे ध्यानात घेऊन यापुढे गुणवत्तेची नवनवी उड्डाणे आपण घेतली पाहिजे. त्याचा फायदा या परिसरातील विद्यार्थ्यांना पर्यायाने समाजाला, राज्याला / देशाला होईल.

उच्चतम गुणवत्ता गाठण्याचा प्रवास आपला सुरु झालेला आहे. मला नेहमीच वाटत असते की, ""Quality is a journey, its never a destination." गुणवत्तासंपादन ही सतत चालणारी प्रक्रिया आहे. ती कधीच संपत नाही. आणखी महत्त्वाचे म्हणजे, '"Quality is not to be controlled but it is to be caused" गुणवत्तेच्या बाबत ती नंतर काही सुधारणा करून हस्तगत करु वगैरे दृष्टी न बाळगता मुळातच अव्यंग, निर्दोष स्वरूपाच्या श्रेष्ठतम पर्यायांचा स्वीकार केला पाहिजे. असे केल्याने आपण गुणवत्तेबाबत अधिकाधिक परिपूर्ण होत जाऊ, यात शंका नाही.

विद्यापीठाप्रमाणे संलग्नित महाविद्यालयांपैकी नऊ महाविद्यालयांनी बंगलोर येथील राष्ट्रीय मूल्यांकन व अधिस्वीकृती परिषदेतर्फे 'अ' श्रेणी प्राप्त केलेली असून अनेक महाविद्यालयांनी मूल्यांकन करून घेतले आहे. उर्वरित महाविद्यालये मूल्यांकनाच्या प्रक्रियेत सामील झाली आहेत.

विद्यापीठ अनुदान आयोगाकडून विद्यापीठाला प्राप्त होणाऱ्या अनुदानातून शैक्षणिक विकासात्मक कामे प्रगतिपथावर आहेत.

विद्यापीठाच्या विविध विभागांमधून संशोधनप्रकल्प राबविले जात आहेत. संशोधनाला चालना देण्यासाठी विद्यापीठ तसेच संलग्नित महाविद्यालयांमार्फत विविध विषयांवर चर्चासत्र परिषदेचे आयोजन होत असते. या वर्षी नोव्हेंबर २०१५ मध्ये विद्यापीठातील गणित विभागातर्फे व्यापक सापेक्षतेवर आंतरराष्ट्रीय परिषदेचे आयोजन करण्यात आले. रसायनशास्त्र विभागातर्फे राष्ट्रीय चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले.तर मराठी विभाग, शिक्षण विभाग, वनस्पतीशास्त्र विभाग, उपकरणशास्त्र विभाग व गृहविज्ञान विभाग यांनी विविध कार्यशाळेचे आयोजन केले.

विद्यापीठाच्या विविध विभागांमधील तसेच संलग्नित महाविद्यालयातील शिक्षकांना विविध मानसन्मान प्राप्त झाले आहेत. विद्यापीठातील काही विभागातील प्राध्यापकांनी आंतरराष्ट्रीय प्रकल्प, चर्चासत्र परिषदांतून सहभागी होत विद्यापीठाचा नावलौकिक उंचावला आहे.

शासनातर्फे दिल्या जाणाऱ्या राष्ट्रीय सेवा योजना राज्यस्तरीय पुरस्कारासाठी उत्कृष्ट कार्यक्रम अधिकारी व उत्कृष्ट स्वयंसेवक म्हणून संलग्नित महाविद्यालयातील प्राध्यापक तसेच स्वयंसेवक यांची निवड झाली. दि. २० डिसेंबर २०१५ रोजी गाडगे बाबांच्या विचारानुसार कार्य करण्याबद्दल 'श्री. संत गाडगे बाबा सामाजिक कार्य पुरस्कार २०१५' विद्यापीठातर्फे प्रदान करण्यात आला.

विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक बांधिलकीचे अंग विकसित होण्यासाठी राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून सत्र २०१५-१६ मध्ये स्वच्छ -स्वस्थ भारत अभियान, वृक्षारोपण, ग्रामविकास उपक्रम, आरोग्य शिबिरे, पर्यावरण व वन्यजीव संवर्धन जनजागृती इत्यादी कार्यक्रम राबविण्यात आलेत. दि. २१ जून २०१५ रोजी आंतरराष्ट्रीय योग दिन साजरा करण्यात आला.

सलग यावर्षीसुध्दा विविध कला व क्रीडा स्पर्धांमद्ये विद्यापीठातील विद्यार्थ्यांनी उत्तम कामगिरी केली. सप्टेंबर २०१५ मध्ये जी.एस.विज्ञान, कला व वाणिज्य महाविद्यालय, खामगाव येथे आंतर महाविद्यालयीन युवा महोत्सवाचे आयोजन करण्यात आले.बुंदेलखंड विद्यापीठ, झाशी येथे नोव्हेंबर २०१५ मध्ये संपन्न झालेल्या मध्य विभाग आंतर विद्यापीठ युवा महोत्सव स्पर्धेत समूहगान भारतीय, समूहनृत्य, वक्तृत्व स्पर्धा, फोक ऑर्केस्टा या प्रकारात विद्यापीठ चमूने प्रथम तर सुगम संगीत, एकांकिका, प्रहसन (स्किट) स्वरवाद्य, पाश्चिमात्य समूहगान या प्रकारांत व्दितीय क्रमांक प्राप्त केला तर संगीत प्रकारात विजेता ट्रॉफी तसेच वरील संपूर्ण कलाप्रकार मिळून एकत्रित चॅम्पियन ट्रॉफी विद्यापीठ चमूने पटकावत नेत्रदीपक यश मिळविले ही विद्यापीठासाठी गौरवाची बाब आहे.

या वर्षी महाराष्ट्र राज्य आंतर विद्यापीठ 'इंद्रधनुष्य' युवा महोत्सव २०१५ या स्पर्धेत समूहनृत्य या प्रकारात विद्यापीठास प्रथम तर समूह संगीत, समूहगान भारतीय या प्रकारात द्वितीय क्रमांक प्राप्त झाला.

जानेवारी २०१६ मध्ये पश्चिम विभागीय आंतर विद्यापीठ व्हॉलीबॉल स्पर्धा (मुली) विद्यापीठाच्या वतीने आयोजित करण्यात आली होती. या स्पर्धेत पश्चिम विभागातील ३६ संघांनी सहभाग घेतला. नांदेड येथे संपन्न झालेल्या महाराष्ट्र राज्य आंतर विद्यापीठ क्रीडा महोत्सव 'अश्वमेध' २०१५ या स्पर्धेत विद्यापीठाने व्हॉलीबॉल (मुले) या प्रकारात प्रथम स्थान पटकावले. याव्यतिरिक्त पतियाळा (पंजाब) येथे संपन्न झालेल्या अखिल भारतीय आंतर विद्यापीठ स्पर्धेत धनुर्विद्या-रिकव्हर (मुले) या प्रकारात विद्यापीठ चमूने प्रथम स्थान प्राप्त केले.

पुणे येथे संपन्न झालेल्या 'आविष्कार' स्पर्धेत विद्यापीठ चमूने उत्तम कामगिरी केली. सर्व यशस्वी खेळाडू, कलावंत तसेच संशोधक विद्यार्थ्यांचे मी कुलगुरू या नात्याने अभिनंदन करतो.

विद्यार्थी कल्याण विभागातर्फे अनेक योजना राबविण्यात आल्या आहेत. सत्र २०१५-१६ मध्ये विद्यार्थी कल्याण निधी शिष्यवृत्ती अंतर्गत एकूण १९४ विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती देण्यात आली.

विद्यापीठ ग्रंथालयाच्या माध्यमातून विविध सुविधा उपलब्ध करून देण्यात येत आहेत. ग्रंथालयात १,०८,९८५ ग्रंथ, १२६ इ-बुक्स, २३४२ प्रबंध, ७०८७ डिजीटाईज्ड प्रती इत्यादी ग्रंथसंपदा उपलब्ध आहे. बुक बँक, लायब्ररी पोर्टल, इ-रिसोर्स ॲक्सेस सेंटर, वेब ओपॅक, रिमोट रिसोर्स ॲक्सेस इत्यादी सुविधा उपलब्ध आहेत. ग्रंथालयाच्या पोर्टलचा उपयोग जगात २५ पेक्षा अधिक देशातील वाचक करीत आहेत. या इ-ग्रंथालयास आजपर्यंत साडेतीन कोटीपेक्षा अधिक हिट्स मिळाल्या असून त्यातून ६२ लाखापेक्षा अधिक पृष्ठ डाऊनलोड करण्यात आले आहेत. दि. १५ ऑक्टोंबर २०१५ रोजी वाचक प्रेरणा दिवस साजरा करण्यात आला.

यावर्षी विद्यापीठाच्या निसर्गरम्य परिसराचे आपण केंद्र शासनाच्या नागपूर येथील National Environmental Engineering Research Institute या मान्यताप्राप्त संस्थेकडून पर्यावरणीय मूल्यमापन (Green Audit) करून घेतले आहे. हिरवाईने नटलेला समृद्ध वृक्षराजींचा हा प्रदूषणमुक्त परिसर असाच चांगला टिकवून ठेवण्याचे पर्यावरणीय कर्तव्य सर्व घटक पार पाडतील अशी मी अपेक्षा बाळगतो.

मित्रांनो आता काही महत्त्वाच्या बाबींविषयी मी विद्यार्थ्यांशी संवाद साधू इच्छितोः

१) आजच्या जीवनात वैयक्तिक आशा-आकांक्षांना आपण फार महत्त्व देत चाललो आहोत. समाजाप्रतिची आपली संवेदना हरवत चालली आहे. पण आजही आपल्या अवती-भवती अशी माणस सापडतात की जी समाजातील इतर व्यक्तींसाठी आपले काही योगदान देऊ पाहतात. बुलडाणा जिल्ह्यातील देऊळगाव माळी येथील राम नगर या युवकाच्या अपघाती मृत्युनंतर, आपला मुलगा गमावणारी गरीब माता काळजावर दगड ठेवून रामच्या अवयवांचे गरजू व्यक्तिंसाठी दान करते. आणि अशा कृतीतून इतरांच्या जीवनात आनंद फुलवते. आपल्या ग्रामीण भागातील दुःखात असलेल्या मातेने हे जे केले त्यापासून आपल्याला निश्चितपणे प्रेरणा घेता येईल.

२) मित्रहो, समाजासाठी कळवळा असणाऱ्या अशा व्यक्तींना आपले रोल मॉडेल म्हणून आपल्याला स्वीकारता येईल. डॉ. प्रकाश आमटे, डॉ. रवींद्र कोल्हे, डॉ राणी-अभय बंग दाम्पत्य,तसेच शंकरबाबा पापळकर इत्यादि निःस्वार्थबुद्धीने काम करणाऱ्या व्यक्ती आपले रोल मॉडेल असायला हरकत नाही.

३) सुशिक्षित व्यक्ती म्हणून समाजाच्या आपल्याकडून निश्चितच काही अपेक्षा आहेत. एक जबाबदार नागरिक म्हणून- समाजाची शांतता व सुरक्षितता जतन करणारा, समाजाच्या भौतिक सोयी-सुविधांची नासधूस न करणारा, राष्ट्राच्या उभारणीत हातभार लावणारा व्यक्ती म्हणून आपण घडावे.

४) समाजापासून "मला काय मिळालं?"यापेक्षा समाजाला "मी काय दिलं?" याचा नेहमी विचार केला पाहिजे. प्रत्येकाने " मी करावे " ही भावना वाढीला लागली पाहिजे. "तो करेल" हे नको.

५) सतत स्वागतशील असलं पाहिजे. दोषारोपणच करत राहाण्याची नकारात्मक वृत्ती बदलली पाहिजे. त्याऐवजी प्रयत्न करून दोष दूर करण्यासाठी सहकार्य करण्याची वृत्ती वाढीला लागली पाहिजे.

६) आजचा तरुण व्हॉटस् ॲप, फेसबुक अशा सोशल मिडियाच्या आहारी जायला लागला आहे. सोशल मिडियाचा वापर तरुणांनी विवेकाने करावा. अन्यथा त्याच्याजवळ वाचन, अभ्यास यांसाठी वेळच उरणार नाही. त्यामागील वेळ वाचवून व्यावसायिक कौशल्ये विकसित करण्यावर भर द्यावा.

७) यशस्वी करण्यासाठी स्थिर वृत्ती, पूर्वग्रहरहित मन अधिक महत्त्वाचे ठरते. पेनल्टी शूटरचा अभ्यासकरणाऱ्या संशोधकाने असा निष्कर्ष काढला की, गोलकीपरला गोल वाचविण्याची सर्वोत्तम संधी तो स्थिर असतो तेव्हाच मिळते. तरीही ९२ टक्के खेळाडू दोनपैकी कोणत्यातरी एका अंगाकडे झेप घेतांना दिसतात. कृतीकडे पाहण्याची पूर्वग्रहदूषित नजर याला कारणीभूत ठरते. शांत राहून कदाचित हवा तो परिणाम मिळविणे सहज शक्य असते.

८) शेवटी मी, आपले एका बोधकथेकडे लक्ष वेधू इच्छितो.महान चित्रकार, शिल्पकार मायकेल ॲंजलोच्या फ्लॉरेन्सस्थित जगप्रसिद्ध १८ फुटी डेव्हीड या पुतळ्याची कथा लक्षात घेण्यासारखी आहे. हा पुतळा ज्या संगमरवरी प्रचंड ठोकळेवजा

पहिली रांग - डॉ.जी.आर. बमनोटे, डॉ.पी.डब्ल्यु. काळे, डॉ.मनोज तायडे, डॉ.आर.एस.सपकाळ, डॉ.सुरेखा काळकर,
डावीकडून उजवीकडे प्रमुख अतिथी मा.प्रो.जी.डी. यादव, मा. कुलगुरु डॉ. मोहन खेडकर, मा.प्र-कुलगुरु डॉ. जयकिरण तिडके,
डॉ.बी.एम.उर्फ संतोषराव ठाकरे,डॉ.एफ.सी. रघुवंशी, डॉ. (श्रीमती) आर.ए. लांडे, डॉ.ए.व्ही. चांदेवार

दुसरी रांग - डॉ.व्ही.एस. चौबे, डॉ.एस.आर. आस्वले, डॉ.जे.डी. वडते, डॉ.एम,एच. लाकडे, कुलसचिव डॉ.अजय देशमुख
डावीकडून उजवीकडे

विद्यादंडधारक - श्री उमाशंकर ठाकूर, श्री दिनेश किल्लेकर

STUDIO SHARMA

तुकड्यांतून घडविल्या गेला तो पूर्वी अनेक वर्षे तसाच पडून होता. लिओनार्दो-दा-विंचीसह अनेकांनी हा दगड निकामी व दोषपूर्ण ठरवला होता. अशा दगडावर मायकेल ॲंजलोने काम सुरू केले आणि त्या वाया गेलेल्या दगडातून अलौकिक अशी प्रतिमा साकार केली. मायकेल त्यावर काम करत असतांना एका मुलाने त्याला विचारले की, " तो असा दगडावर हातोडा का आपटत बसला आहे?" मायकेलने त्याला उत्तर दिले, "तरुण मुला, यात एक देवदूत राहतो. मी त्याला मुक्त करत आहे".

मित्रहो दगडातून अलौकिक सौंदर्य साकार करणारे मायकेल ॲंजलो तुम्ही बना. तुमचे कार्य जगाला दीपवित राहील. ते सामर्थ्य आपल्यात नक्कीच असते. या बोधकथेतला आणखी एक अर्थ आपल्याला ध्यानात घेता येईल. तो म्हणजे, तुमच्यातला देवदूत बाहेर येण्याची वाट पाहात आहे. त्यामुळे तुम्ही योग्य शिल्पकाराच्या योग्य प्रकारच्या शिक्षणरूपी संस्काराच्या सान्निध्यात या. यातून तुमची तेजस्वी मूर्ती बाहेर येईल व ती जगाला दीपवत राहील.

मित्रहो, गुणवत्ताच शेवटी श्रेष्ठ ठरते.

गुणाः सर्वत्र पूज्यन्ते, पित्रृवंशो निरर्थकः

वासुदेवं नमस्यन्ति, वसुदेवं न मानवाः

व्यक्तीचे गुण सर्वत्र पूजनीय असतात. आपण कोणाच्या वंशात जन्म घेतला यास महत्त्व नाही. आजही आपण वासुदेवाला (श्रीकृष्णाला) नमस्कार करतो. पण त्यांचे वडील वसुदेवाला करीत नाही.

पुन्हा एकदा सर्वांचे स्वागत करतो तसेच पदवी, पदके व पारितोषिके प्राप्त करणाऱ्या विद्यार्थ्यांचे हार्दिक अभिनंदन करतो.

धन्यवाद!

जय हिंद, जय महाराष्ट्र !

*****

३) बत्तिसावा दीक्षांत समारंभ

दिनांक २० फेब्रुवारी, २०१६

मा. पद्मश्री प्रो.जी. डी. यादव

कुलगुरू, रसायन तंत्रज्ञान संस्था, माटुंगा, मुंबई यांचे दीक्षांत भाषण

माननीय कुलगुरू, विद्वत सभेचे सदस्य, अभ्यास मंडळाचे सदस्य प्रकुलगुरू, कुलसचिव, महाविद्यालयांचे प्राचार्य, सन्माननीय अतिथी इतर अभ्यागत आणि आज जे पदवी समारंभात स्वतः पदवी घेण्यासाठी हजर आहेत त्या स्नातक बंधु भगिनींनो.

माझ्या मते आयुष्यातल्या काही अत्यंत महत्त्वाच्या दिवसांमध्ये ज्याची नोंद करावी असा तो दिवस म्हणजे पदवीदान किंवा दीक्षांत दिन. दीक्षा दिली जाते आणि दीक्षा घेतली जाते. दीक्षा देणे हे दीक्षांत समारंभामध्ये कुलगुरुंचे कर्तव्य असते आणि अशाप्रसंगी एखाद्या नामांकित व्यक्तिला बोलवून त्यांच्याकडून उपदेश देण्याची ही त्या मागची भावना असते.मला हा सन्मान आपल्या कुलगुरुंनी, व्यवस्थापकीय मंडळींनी आणि आपल्या विद्वत सभेने दिला आहे त्याबद्दल मी त्यांचा आभारी आहे. या विद्यापीठाला संत गाडगेबाबांचे नाव दिले त्यामुळे या विद्यापीठाकडून निराळ्या अपेक्षा आहेत. या दिवशी प्रत्येकाने थोडा वेळ स्तब्ध होऊन विचार करणे प्राप्त आहे. आपल्या विद्यापीठाने आपणास कोणते ज्ञान दिले त्यापेक्षा त्या ज्ञानाबरोबर अजून बरेच काही मौलिक ज्ञान दिले याचे भान आपण ठेवले पाहिजे. इथे आल्यावर नवीन मित्र मैत्रिणी, नवे प्राध्यापक, नवे विचार आणि अनेक नवीन प्रकारची नाती आपल्याला या विद्यापीठाने दिली आहेत. या सर्वांची आठवण केल्यावर आपल्याला असे कळून येईल की विद्यापीठे आजकाल फक्त ज्ञान हे गुरुकडूनच देत नाहीत परंतु इतर मार्गांनीही देतात आणि त्यासाठी आपल्याला अनेक बाबींचा विचार करावा लागेल.

आपण भूतकाळात गेलो किंवा पौराणिक कथांचा विचार करतांना आपणास गुरू द्रोणाचार्य आणि एकलव्याची कथा मनाला स्पर्श करून जाते.अर्जुनाला धर्नुविद्येचे धडे देऊन द्रोणाचार्यांना त्यांना जगातला सर्वात मोठा धनुर्धर बनवायचा असतो आणि अशावेळी एकलव्य त्यांच्याकडे धर्नुविद्येचे ज्ञान मिळावे म्हणून जातो. त्यावेळी द्रोणाचार्य त्याला ज्ञान देण्यास नकार देतात. एकलव्य दुरवरून झाडीत बसून अर्जुनाला कसे शिक्षण दिले जाते ते पाहतो आणि द्रोणाचार्य निघून गेल्यावर तिथे जाऊन तिथली माती घेऊन येतो आणि त्याचा तो पुतळा बनवतो आणि हा पुतळा म्हणजे त्यांचा गुरू द्रोणाचार्य. त्या पुतळ्यांच्या साक्षीने धनुर्विद्येचे सर्व ज्ञान त्याने प्राप्त केले. काही दिवसांनी द्रोणाचार्यांना असे समजते की, आपल्या अर्जुनापेक्षाही एकलव्य हा मोठा धनुर्धर आहे आणि त्याने ज्याअर्थी आपला पुतळा तयार करून ज्ञान घेतले त्याअर्थी तिथे त्याने ज्ञानाची चोरी केली आहे आता आपल्याला विचार करावा लागेल की खरोखरच एकलव्य ज्ञानार्जन करतांना चोर होता का? आणि त्याचे गांभीर्य काय? त्यावेळी द्रोणाचार्याकडे एकलव्य गेला असताना त्याने सांगितले की, मी तुमचा पुतळा बनवून त्याच्यासमोर धनुर्विद्या शिकलो आहे. एकलव्याची जात म्हणा किंवा इतर काही कारणांनी द्रोणाचार्य त्याला म्हणतात, "तुला माहिती असेल एकलव्य की गुरुला दक्षिणा द्यायची असते" आणि गुरु द्रोणाचार्यांनी त्याला त्याचा उजव्या हाताचा अंगठा बहाल करण्याची आज्ञा देतात. याचा मतितार्थ असा की खरा गुरु समोर नसतांना ज्ञानार्जन करता येते. आजच्या जमान्यातील इंटरनेट हा द्रोणांचाच अवतार आहे. फक्त ते अंगठा मागत नाही किंवा दिशा, देश, भाषा. वय, लिंग याचा कसलाही भेदभाव न करणारा जगद्गुरु झाले आहे. परंतु आजच्या एकलव्याला खूप विचारांना खरे खोटे जाणून घेण्याची गरज आहे.

मघाशी मी सांगितल्याप्रमाणे शिक्षणाचा मुख्य उद्देश काय आहे? शिक्षणाचा मुख्य उद्देश फक्त ज्ञानार्जन नसून कृती करणे आहे असे हार्बट स्पेंसर नावाचे एक अमेरिकन गृहस्थ बोलून गेले. जवळजवळ १०० एक वर्षापूर्वी. मग त्या दृष्टीने आपण जर विचार केला तर विद्यापीठाचे काम हे नवे ज्ञान निर्माण करायचे असते आणि तेही फक्त ज्ञान नुसतं नवीन नसून ते शास्त्र आणि तंत्र यांच्या अग्रेसर भागी असले पाहीजे. त्यानंतर हेच ज्ञान त्यांनी विद्यार्थ्यांना दिले पाहिजे आणि विद्यार्थ्यांना ज्ञान देताना त्या विद्यार्थ्यांनी त्यातले कितपत ज्ञान आकलन केले आहे हेही बघणे महत्त्वाचे असते आणि म्हणून ज्याला इंग्रजीत म्हणतात की Innovation should guide university education प्रत्येक ठिकाणी Innovation म्हणजे नावीण्य असले पाहिजे आणि या दृष्टीने जर आपण विचार केला तर आपल्या देशामध्ये शिक्षणाबद्दल खूप मोठी चर्चा चालू आहे. जेव्हा जेव्हा कधी जगातील निरनिराळ्या विद्यापीठांच्या क्रमांकाबद्दल चर्चा होते किंवा असे क्रमांक दिले जातात त्यावेळी आपण सर्वजण बोलून सांगतो की भारतातील एकही विद्यापीठ किंवा



मा. पद्मश्री प्रो.जी. डी. यादव

कुलगुरू, रसायन तंत्रज्ञान संस्था, माटुंगा, मुंबई

आय.आय.टी. पहिल्या १०० क्रमांकामध्ये नाहीत आणि त्याचे कारण आपल्या शिक्षण पद्धतीत आहे किंवा आपल्या संशोधन करण्याच्या वृत्तीमध्ये आहे. किंवा आपल्याकडे जे नवे ज्ञान निर्माण करणे Innovation ज्याला म्हणतात त्याच्या कमतरतेमुळे आहे हे बघणे महत्त्वाचे ठरते. अर्थात त्याच्यात दुसरा एक भाग आहे. त्याच्यामध्ये की ज्याला सेंट्रल युनिव्हर्सिटीज आणि स्टेट युनिव्हर्सिटीज, म्हणजे भारत सरकारची विद्यापीठे आणि राज्यातील विद्यापीठे यांच्यामध्ये खूप तफावत आहे. याचे कारण असे की सेंट्रल युनिव्हर्सिटीजना एकप्रकारे झुकतं माप दिले जाते आहे आणि त्यामुळे ज्ञानाचे किंवा संशोधनाचे ज्याला आपण Quality म्हणजे दर्जा खूप खालावला गेला आहे आणि त्यामुळे Spirit of Innovation जे आहे त्याचे नवे ज्ञान निर्माण करण्याची वृत्ती खालावली गेली आहे आणि त्यादृष्टीने आपल्याला विचार करणे महत्त्वाचे आहे. तुम्ही अमेरिकेचे उदा. घेऊ त्यांच्यातले जी.डी.पी. म्हणजे दरडोई उत्पन्न ज्याला म्हणतात ते १५ पूर्णांक ६८ ट्रीलियन म्हणजे इतके डॉलर आहे. आणि जर तुम्ही विचार केला तर १९७०साली अमेरिका, चीन आणि भारत या तिन्ही राष्ट्रांच्या पण ट्रिलियन डॉलर मध्ये जी.डी.पी. बघुया त्यावेळेला अमेरिका फक्त १ पूर्णांक ५ दशांश इतके ट्रिलियन डॉलर उत्पन्न होते.भारत आणि चीन त्याच्यामागे अगदीच नगण्य होते परंतु ही १९७० सालची गोष्ट. परंतु तुम्ही काही विचार केला तर इ. सन २००० मध्ये भारताची परिस्थिती थोडी बरी होती म्हणजे ९०० म्हणजे अमेरिकेच्या मानाने आपण खूपच कमी होतो. आणि २०१२ मध्ये ज्यावेळी अमेरिका १५ पूर्णांक ६८ ट्रिलियन डॉलर इतके उत्पन्न असतांना चीनचे उत्पन्न हे ८ ट्रिलीयन डॉलर इतके होते आणि भारताचे फक्त २ ट्रिलीयन डॉलर आणि याचे कारण काय याचा आपण थोडा विचार करुया. याचे कारण की ज्याला आपण टिपींग पॉईंट म्हणतात तो टिपींग पॉईंट म्हणजे त्याच्यात काहीतरी क्रांतिकारी घटना झाल्या आणि या घटना कशा होतात याबद्दल सांगावस वाटत की, आचार्य दादा धर्माधिकारी यांनी क्रांतिकारी तरुण या नावाचे एक पुस्तक लिहिले आहे. मी खूपखूप वर्षापूर्वी ते पुस्तक वाचल होते. तर त्याच्यामध्ये जर ज्ञानाची क्रांति झाल्याशिवाय आपल्याला तरणोपाय नाही असे सांगितले तर या अमेरिकेच्या बाबतीत काय झाल लक्षात घ्या. १९७४ च्या दरम्यान त्यांच्यामध्ये पहिला टिपींग पॉईंट म्हणजे क्रांतिकारी घटना झाली. आणि दुसरा टिपींग पॉईंट हा जवळजवळ १९९५ च्या दरम्यान झाला आणि त्या कशामुळे झाल्या हे आपण लक्षात घेऊ हे टिपींग पॉईंट म्हणजे काय की, एक म्हणजे सीलीकॉन व्हॅली आणि दुसरा म्हणजे जीन टाऊन. सीलीकॉन व्हॅली म्हणजे त्यांच्या कॅलिफोर्नियामधे आणि जीन टाऊन हे मॅसेजविसेज मध्ये बॉस्टन मध्ये आहे. आणि याचे कारण असे आहे की या प्रत्येक बाबतीत तुम्ही विचार केला तर या Innovation मध्ये ज्याला Innovation hub असे म्हणता येईल हा Innovation च्या क्रांतीमध्ये एका महान विद्यापीठाचा हात आहे आणि कुठली ही महान विद्यापीठं एक म्हणजे की स्टॅन्डफर्ड, हार्वर्ड आणि एम.आय.टी. तर विद्यापीठ म्हणजे नुसत काही बिल्डींग्स किंवा तिथे असलेली काही उपकरणं नसून शिक्षक, विद्यार्थी, माजी विद्यार्थी आणि त्यांना साथ देणारे शिक्षकेतर कर्मचारी ह्यांनी ज्यावेळेला एकाग्रतेने त्याच्यात भाग घेतला त्याचवेळेला नवीन ज्ञान निर्माण होते आणि ज्ञानाची वृद्धी होते. तुम्ही विचार करा की स्टॅन्डफर्ड चे २ पूर्णांक ६० दशांश ट्रिलियन डॉलरच उत्पन्न, एरिया ३३ पूर्णांक १ स्क्वेअर २ ट्रिलियन डॉलरच एरिया ० पूर्णांक ६८ शतांश किलोमीटर स्क्वेअर आणि बाकीचा अमेरिका देश १० पूर्णांक १२ ट्रिलियन डॉलर याचा अर्थ जवळजवळ एक तृतियांश उत्पन्न जी.डी.पी.हे या दोन महत्त्वाच्या विद्यापीठांनी केलेले आहे. याचा अर्थ असा होतो की विद्यापीठे नुसतेच ज्ञान निर्माण करीत नाहीत तर ते नवीन संपत्ती निर्माण करतात आणि ही संपत्ती आपण कशी निर्माण करू शकतो याबद्दल मला थोडे बोलायचे आहे आणि त्यादृष्टीने जी मघाशी मी एकलव्याची गोष्ट सांगितली त्या गोष्टींचा थोडा उहापोह चर्चा होणे गरजेचे आहे.

आजकालच्या जगामध्ये कृत्रिम भिंती राहिलेल्या नाहीत आणि त्या नसल्यामुळे आपल्याला www म्हणजे इंटरनेट आणि या इंटरनेटचा आपण कसा फायदा घेऊ शकतो याचे मी काही उदा. देईन हे www म्हणजे World Wide Web नसून Wisdom Welth आणि Worship याचे Combination आहे.

ज्ञान आणि संपत्तीची पूजा केली पाहिजे याचा अर्थ लक्ष्मी आणि सरस्वती या दोघांचे मीलन झाले पाहिजे. म्हणजे ज्ञानपूजेने लक्ष्मीची निर्मिती करावयाची आणि ज्ञानाला कुठल्याही सीमा नाहीत. आणि म्हणून मला असे वाटते की विद्यापीठांचे काम हे नवे ज्ञान निर्माण करावयाचे आहेच, परंतु त्याप्रमाणे नवीन आकलन शक्ती विद्यार्थ्यांना देण्याचे आहे. आणि त्यासंबंधात मला काही गोष्टी सांगाव्याशा वाटतात.

यजुर्वेदामध्ये एक श्लोक आहे. 'आ शिक्षाय प्रशिनम, अशिक्षाया अविप्रश्रिम, आ शिक्षाय प्रश्रिम, अविप्रश्रिनम, उपशिक्षाया अविप्रश्रिनम' याचा अर्थ For learning the question for learning the nearone from all sites शिक्षणात शिकण्यासाठी आपण प्रश्न विचारले पाहिजेत आणि ते प्रश्न आपल्या गुरूपासून घेताना त्यांनाही प्रश्न विचारले पाहिजेत लक्षात घ्या याची प्रचिती आपल्याला प्राचीन ग्रीक संस्कृतीमध्ये दिसते. म्हणजे शिष्य गुरू जे सांगेल ते न मानता उलट दुसरे प्रश्न विचारायचा. तर याप्रमाणे

आपल्याला सॉक्रेटिस, प्लेटो आणि अरिस्टॉटल या तत्त्वज्ञान्यांची माहिती घेणे जरुरीचे आहे. तिकडे ग्रीस मध्ये एक अतिशय सुंदर प्रकारची कल्पना होती की, जे तुम्ही बघता ते सत्य नाही. त्याच्या मागे काहीतरी दुसरे सत्य आहे. त्याला संस्कृत मध्ये 'चक्षुवैसत्यम',जे आपल्या डोळ्यांना दिसते ते सत्य आणि ग्रीक मध्ये 'चक्षुरवैअसत्यम्' जे आपल्या डोळ्यांना दिसते सत्य नसते असे मानतात. हे कशामुळे हा परिणाम शास्त्रीय दृष्टीकोनामुळे झाला आहे. याच्यावर ध्यान ठेवले पाहिजे. मग अशावेळी विद्यापीठांनी या विद्यार्थ्यांनी असे म्हणायला पाहिजे 'सखायः ऋतुम् इच्छत' साथिदारांनो आपले ज्ञानांग वाढविण्यासाठी प्रार्थना करा आणि त्यावेळी हे ज्ञान वाढविण्यासाठी आपली दृष्टी कशी असली पाहिजे याचे एक उदा. ऋग्वेदात दिलेले आहे. 'चक्षुर नो धेहि चक्षुषे, चक्षुर विख्यै तनुभ्यः।। सं चेदं चि य पश्चेम।।'

याचा अर्थ काय की आमच्या डोळ्यांना ज्या नेत्रांना तुम्ही दृष्टी दिली देवा आमच्या शरीरालाही तू डोळे दे. म्हणजे ते सगळ बघू शकतात. आणि आपण हे सर्व जग त्याच्या सर्वप्रकारच्या अवतारामध्ये सूक्ष्मरित्या बघू शकतो. Give site to our eyes, Give site to our bodies so they can see the world as we may be see it in detail मग हे ज्ञान आपल्याला जर विद्यापीठे देत असतील तर विद्यापीठांत नवे निर्माण करण्यासाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा आपण उपयोग केला पाहिजे, आणि मगाशी मी म्हटल्याप्रमाणे एकलव्याची कथा मी नवीन पद्धतीने सांगू इच्छितो. आता आपण एकलव्याच्या कथेतील एक एक शब्द घेत जाऊ Ekalavya म्हणजे माझ्यामते E -Electronics आणि इंटरनेटचा आपण ज्ञानासाठी उपयोग केला पाहिजे. K म्हणजे त्याच्यात ज्ञान असल पाहिजे. A म्हणजे accessible and affordable म्हणजे सगळ्यांना ते वापरण्याची मुभा असली पाहिजे तसेच ते परवडलेही पाहिजे, Lम्हणजे शिकणाऱ्याला ते चिरंतन राहणारे असले पाहिजे. दुसरा A म्हणजे ते ज्ञान आपण कधीही घेऊ शकलो पाहिजे. V म्हणजे Valuable and vibrant म्हणजे ज्ञानाची महती जास्त व प्रेरणादायक असली पाहिजे. Y म्हणजे Youthful म्हणजे ज्ञान हे नव असल पाहिजे आणि A म्हणजे Anywhere म्हणजे ज्ञान हे कुठेही कधीही मिळविता आले पाहिजे. हे WWW म्हणजे इंटरनेटमुळे शक्य झाला आहे. त्या दृष्टिने विद्यापीठांनी कोर्सेस शिकवतांना किंवा नवीन ज्ञान देतांना त्याचा वापर केला पाहिजे. आजकाल पूर्वीचे क्लासरुम ज्याला आपण वर्गात बसून शिक्षण घेणे तर शिक्षकांनी जुन्या पद्धतीची शिक्षण पद्धती सोडून नव्याप्रकारचे धीट असे विद्यार्थी व ज्ञान निर्माण केले पाहिजे. याचा अर्थ असा की शिक्षकांनी शिकविण्यात कमी वेळ घालवला पाहिजे आणि कल्पनांचा विकास केला पाहिजे. आणि ज्यावेळेला आपण कृती करतो त्यावेळी आपण विद्यार्थ्यांना पुस्तक वाचून वर्गात येण्यास सांगून त्याच्यावर चर्चा केली पाहिजे.यामुळे काय होते तर विद्यार्थ्याला पार्टीसीपेटीव्ह लर्निंग शिकता येते. तर विद्यापीठांनी आपल्या विद्यार्थ्यांसाठी निरनिराळी ॲप्स निर्माण करणे गरजेचे आहे. किंवा अशी ॲप्स जर बाजारात असतील तर त्याचा वापर करणे गरजेचे आहे. कारण आजकालचे जग हे बाऊंड्रीलेस आहे.

मघाशी म्हटल्याप्रमाणे केशवसुतांनी एक अतिशय सुंदर कविता लिहिली होती. त्याच्यामध्ये जुन्या वाईट प्रथा टाकून देण्याविषयी उपदेश होता आणि ती कविता अशी होती की,

"काठोकाठ भरु द्या प्याला फेस फरपूर उसळु द्या. आणि जुने जाऊ दे मरणा लागुनी हे मत लोका कळवू द्या"

मला असे वाटते की विद्यापीठाची ख्याती किंवा एखाद्या संस्थेची ख्याती या तिथल्या चार घटकांवर अवलंबून असतात. पहिला घटक हा शिक्षक असतो. दुसरा घटक हा विद्यार्थी असतो. तिसरा घटक हा माजी विद्यार्थी असतो आणि चवथा घटक हा तिथला शिक्षकेतर कर्मचारी असतो आणि या चारीच्या जिवावरती विद्यापीठाची कीर्ती वृद्धींगत होते; पण कधी कधी आपण असे बघतो की, विद्यापीठांची ख्याती वाढवण्यापेक्षा त्याची ख्याती कमी करण्यामध्ये लोक गुंतलेले असतात. त्यांना असे वाटत नाही की आपल्या विद्यापीठासाठी आपण काही केल पाहिजे आणि त्याची ख्याती वाढवली पाहिजे आणि या दृष्टीने मी एक कविता लिहिलेली आहे आणि त्या कवितेच नाव आहे 'निर्मिती'. ती कविता भावनात्मक आहे त्याच्यामागे खूप मोठा विचार आहे आणि त्याचा अर्थ ती कविता तुम्हाला एक दोनदा वाचल्यावरती कळेल.

अति सुंदर भव्य इमारत
निर्मळ होते वहात पाणी।।
नदी किनारी बाग बगीचे
सुरम्य विहंग गाती गाणी।।
ज्ञान सुगंध चहु बाजुला

कीर्ती तिची भिडली गगनी
आणि अचानक आले धावुनी
वार सपासप हातोडे घेऊनी।।
छप्पर तुटले तुटल्या भिंती
मस्तवाल ते गाणे गाती।।
पुसले त्यांना कोण तुम्ही हो
नाही ऐकता आमचा टाहो।।
म्हणाले आमचे काम तोडणे
जोडणे नाही नाही शिकणे।।
कोणी म्हणाले आमचा म्होरक्या
तोडाफोडी त्याचा खाक्या
क्षणात तोडू भव्य इमारत
आमचे ब्रीद ना खेद ना खंत
पिढ्या गेल्या वर्षे गेली
तेव्हा कुठे निर्मिती झाली।।
विटाविटांनी कणाकणांनी
जोडूनी हृदये सर्वजणांनी
सौंदर्य हीचे वाढली प्रतिष्ठा
आई आमुची आमुची आस्था
फेका हातोडे करा निर्मिती
जोडा पुन्हा वाढवा कीर्ती
अती सुंदर भव्य इमारत
करा निर्मिती तिची अविरत।।

मला या विद्यापीठाने बोलावून जो माझा सन्मान केला त्याच्याबद्दल मी त्यांचा आभारी आहे आणि मला अस वाटतं की अमरावती व संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ हे भारतातलं उत्तम दर्जाच विद्यापीठ होऊन विकसित होईल. त्याचा विकास करण्यामध्ये इथल्या शिक्षकांचा, इथल्या कर्मचाऱ्यांचा, माजी विद्यार्थ्यांचा आणि इतर मंडळींचा हातभार लागेल याची मला खात्री आहे. स्नातकहो,

If you get up in the morning
With your hardest job to do,
Don't start the day with grumbling
That won't help you see it through
Be glad for work that's difficult
For tasks that challenge you
Workers find a thousand blessings
The idle never knew.

जय हिंद, जय महाराष्ट्र !

*****

4) Research Work Completed during the Annual Report Year 2015-2016

Sr. No.	Faculty	Subject	Number of Research Work Completed.
1.	2.	3.	4.
1.	Arts	Marathi	16
		Hindi	5
		English	13
		Music	6
		Urdu	8
		Pali & Prakrit	3
		Sanskrit	1
2.	Social Science	Political Science	15
		Sociology	6
		Economics	16
		Library & Information Science	17
		History	16
		Home Economics	2
		Yogashatra	1
		Geography	1
		Social Work	4
		Mass Communication	1
3.	Commerce	Business Management	6
		Commerce	14
		Business Economics	10
4.	Science	Biotechnology	2
		Zoology	9
		Chemistry	23
		Physics	12
		Mathematics	13
		Environmental Science	4
		Microbiology	17
		Geology	2
		Botany	13

1.	2.	3.	4.
		Computer Science	2
		Statistics	1
		Electronics	1
5.	Education	Education	23
		Physical Education	16
6.	Medicine	Pharm. Sci.	1
7.	Engineering	Electronics Engg.	20
	& Technology	Comp. Sci. & Engg.	22
		Mechanical Engg.	7
		Chemical Technology	4
		Civil Engg.	4
		Electrical Engg.	4
		Information Technology	1
8.	Law	Law	3
9.	Home Science	Cosmetic Technology	1

५) दीक्षांत समारंभात कुलसचिवांनी घोषित केलेली प्राप्त देणग्यांची सूची

अ.क्र.	देणगी देणा-याचे नांव	देणगीचे स्वरूप	देणगीचे नांव	परीक्षा/ उद्देश	देणगीची रक्कम
१	२	३	४	५	६
१.	जवाहरलाल दर्डा इन्स्टिट्यूट ऑफ इंजिनिअरिंग एण्ड टेक्नॉलॉजी, यवतमाळ.	सुवर्णपदक	स्वातंत्र्यसेनानी जवाहरलाल दर्डा सुवर्णपदक	अभियांत्रिकी स्नातक (मेकॅनिकल इंजिनिअरिंग)	१,५०,०००
२.	जवाहरलाल दर्डा इन्स्टिट्यूट ऑफ इंजिनिअरिंग एण्ड टेक्नॉलॉजी, यवतमाळ.	सुवर्णपदक	स्वातंत्र्यसेनानी जवाहरलाल दर्डा सुवर्णपदक	अभियांत्रिकी स्नातक (इलेक्ट्रॉनिक्स ॲन्ड टेलीकॉम्युनिकेशन इंजिनिअरिंग)	१,५०,०००
३.	जवाहरलाल दर्डा इन्स्टिट्यूट ऑफ इंजिनिअरिंग एण्ड टेक्नॉलॉजी, यवतमाळ.	सुवर्णपदक	स्वातंत्र्यसेनानी जवाहरलाल दर्डा सुवर्णपदक	अभियांत्रिकी स्नातक (कॉम्पूटर सायन्स इंजिनिअरिंग)	१,५०,०००
४.	जवाहरलाल दर्डा इन्स्टिट्यूट ऑफ इंजिनिअरिंग एण्ड टेक्नॉलॉजी, यवतमाळ.	सुवर्णपदक	स्वातंत्र्यसेनानी जवाहरलाल दर्डा सुवर्णपदक	अभियांत्रिकी स्नातक (इन्फॉरमेशन टेक्नॉलॉजी)	१,५०,०००
५.	जवाहरलाल दर्डा इन्स्टिट्यूट ऑफ इंजिनिअरिंग एण्ड टेक्नॉलॉजी, यवतमाळ.	सुवर्णपदक	स्वातंत्र्यसेनानी जवाहरलाल दर्डा सुवर्णपदक	बॅचलर ऑफ टेक्नॉलॉजी (केमीकल इंजिनिअरिंग)	१,५०,०००
६.	जवाहरलाल दर्डा इन्स्टिट्यूट ऑफ इंजिनिअरिंग एण्ड टेक्नॉलॉजी, यवतमाळ.	सुवर्णपदक	स्वातंत्र्यसेनानी जवाहरलाल दर्डा सुवर्णपदक	बॅचलर ऑफ टेक्सटाईल इंजिनिअरिंग	१,५०,०००
७.	जवाहरलाल दर्डा इन्स्टिट्यूट ऑफ इंजिनिअरिंग एण्ड टेक्नॉलॉजी, यवतमाळ.	सुवर्णपदक	स्वातंत्र्यसेनानी जवाहरलाल दर्डा सुवर्णपदक	अभियांत्रिकी स्नातक (सर्व शाखांमधून प्रथम - इंजिनिअरींग ॲन्ड टेक्नॉलॉजी)	१,५०,०००

६) पदके/पारितोषिके

दीक्षांत सभारंभात विद्यार्थी/विद्यार्थिनींना विविध अभ्यासक्रमात स्पृहणीय यश संपादन केल्याबद्दल प्रदान करण्यात आलेली विद्याशाखानिहाय पदके/पारितोषिके.

अ.क्र.	विद्यार्थ्यांचे नाव व महाविद्यालय	पदक/पारितोषिकाचे नाव	पात्रता परीक्षा	गुणानुक्रम
१	२	३	४	५
		कला विद्याशाखा		
१.	कु. मोबिना अंजुम सय्यद शाकीर, शासकीय विदर्भ ज्ञान विज्ञान संस्था, अमरावती.	मा.कुलपतींचे सुवर्णपदक व रु.१०००/- किंमतीची पुस्तके	वाङमय पारंगत (उर्दु)	प्रथम श्रेणीसह
